

वेळसाव सरपंचासह चार जणांविरोधात गुन्हा दाखल पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्समध्ये क्वालिफायर २ साठी चुरस पान ४ वर

वेर्णा, सोमवार, २ जून २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 270 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 2 June 2025 | Pages 4 | ₹ 4

# ॲग्रीगेटर ॲप विरोधात स्थानिक टॅक्सी चालकांचा एल्गार !

## ॲग्रीगेटर धोरण पूढे रेटल्यास मोर्चे-रस्ता रोकोसह तीव्र आंदोलनाचा इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड :

**हरमल/म्हापसा, दि. १ : राज्यातील पारंपरिक व स्थानिक टॅक्सी व्यावसायिकांनी सरकारच्या नव्या 'कॅब ॲग्रिगेटर' ॲपला तीव्र विरोध नोंदवित पुन्हा रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला आहे. हरमल येथील मैदानावर सोमवारी झालेल्या बैठकीत मांद्रे परिसरातील शेकडो चालकांनी एकमुखीने ॲप तातडीने रद्द करण्याची मागणी केली. तर दुसरीकडे म्हापसा - साळगावमधील टॅक्सी चालकांनी आमदार केदार नाईक यांना निवेदन देत नवे टॅक्सी धोरण रद्द करण्यासाठी हस्तक्षेप करण्याची मागणी केली.**



हरमल येथील बैठकीनंतर टॅक्सी चालकांनी 'आमका नाका, ॲप-बेस्ड टॅक्सी आमका नाका' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. ॲग्रीगेटर ॲप धोरणाच्या निषेधाचे निवेदन पेडणे वाहतूक खात्यात सादर करण्यात आले.

याबाबत स्थानिक टॅक्सी मालक महादेव गावडे म्हणाले की, किनारपट्टीत बहुसंख्य व्यावसायिक गेली अनेक वर्षे प्रामाणिक सेवा देत आहेत. काहींच्या चुकीचे खापर सर्वांच्याच डोईवर फोडू नये. ॲप धोरण त्वरित थांबवा. गावडे म्हणाले, गोमंतकीयांकडे घरटी किमान एक-दोन चारचाकी आहेत; त्यामुळे स्थानिकांकडूनच अधिक वाहन सेवा मिळते. ॲप सुरू झाल्यास उत्तर प्रदेश-बिहारातून मोठ्या प्रमाणावर चालक येऊ शकतात आणि परिणामी सामाजिक अशांतता व गुन्हेगारी वाढू शकते.

बैठकीस बर्नार्ड डिसोझा, प्रदीप वस्त, मॅन्युएल फर्नांडिस, विठ्ठल मांद्रेकर, रुजय फर्नांडिस यांच्यासह हरमल-मांद्रे-मोरजी-केरी-पालये भागातील टॅक्सी मालक उपस्थित होते. सर्वांनी सरकारने स्थानिकांच्या व्यवसायास आणखी संकटात न ढकलता ॲप रद्द करावे अशी मागणी केली.गेल्या ३० वर्षांत कधीही एवढा अन्याय अनुभवला नाही. सरकार कोणत्या अमिषाला बळी पडून आमचा व्यवसाय उद्ध्वस्त करत आहे ? असा सवाल यावेळी संदीप वायंगणकर, या ज्येष्ठ टॅक्सी मालकांनी उपस्थित केला . वायंगणकरांनी मुख्यमंत्री प्रमोद सावंत व वादग्रस्त वाहतूक मंत्र्यांना निर्णय परत घेण्याचे आवाहन करत, गरज पडल्यास हक्कांसाठी लढा तीव्र करू, असा इशारा दिला.

चालकांनी स्पष्ट केले की, कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, वैद्यकीय खर्च यासाठी तेच व्यवसाय एकमेव आधार आहे. बँक हप्ते, विमा-परवाने व इतर कर वेळेवर भरण्याची जबाबदारी आमच्यावर आहे; तरीही सरकारकडून कोणतीही आर्थिक मदत नसताना ॲप'ने स्थानिकांना भरडले जाणार, असा आरोप व्यावसायिकांनी केला.

पान २ ▶



# ईशान्येत भीषण जलप्रलय : ३० जणांचा मृत्यू

▶ **१७५ गावे जलमय : हजारो लोक बेघर**

**गुवाहाटी, दि. १ :**

ईशान्य भारतात गेल्या चार दिवसांपासून कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे आसामसह शेजारील राज्यांमध्ये पूर - भूस्खलनाचा कहर वाढला आहे. राज्य व केंद्र सरकारच्या प्राथमिक अहवालानुसार, मागील ४८ तासांत किमान ३० जणांनी प्राण गमावले असून ६० हजारांहून अधिक नागरिक बाधित झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसाने आसामसह ईशान्य भारताला अक्षरशः गिळंकृत केले आहे.

गेल्या ४८ तासांत पावसाने कहर केला असून, आसामसह सिक्कीम, मणिपूर, त्रिपुरा, मिझोरम आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांतील अनेक भाग पूराच्या पाण्याखाली गेले आहेत. एकीकडे माती सरकते आहे, दुसरीकडे नद्या उफाळून वाहत आहेत.

आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या संध्याकाळी आलेल्या अहवालात दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील १२ जिल्ह्यांतील १७५ हून अधिक गावे पूर्णतः पाण्याखाली गेली आहेत. लखीमपूर जिल्ह्यात पुराचा सर्वाधिक प्रकोप असून, हजारो लोकांनी घरे सोडून मदत छावण्यांचा आसरा घेतला आहे.डाळी, तांदूळ, मीठ, गूळ, चिवडा.. या तुटपुंज्या वस्तूंमध्ये सध्या लोकांचा जगण्याचा आधार सामावलेला आहे.पाणी केवळ रस्त्यांवरच नव्हे, तर लोकांच्या दैनंदिन आयुष्यांमध्ये शिरलं आहे.लखीमपूरमध्ये एक, गोलाघाटमध्ये दोन आणि गुवाहाटीच्या बोंडात पाचजण भूस्खलनात मृत्युमुखी पडले आहेत,मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी गृहमंत्री अमित शहा यांच्याशी संवाद साधून मदतीची मागणी केली असून, केंद्राकडून सर्वतोपरी मदतीचे आश्वासन देण्यात आले आहे.

पान २ ▶

# गोवा चेंबर ऑफ कॉमर्सने जीएसटी प्रणालीत सुचवल्या सुधारणा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

मडगाव, दि. १ : गोवा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (जीसीसीआय) ने वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) प्रणालीत आवश्यक सुधारणा सुचवणारे एक सविस्तर निवेदन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याकडे सादर केले आहे. आगामी जीएसटी परिषद बैठक लक्षात घेता ही शिफारस महत्त्वाची मानली जात आहे, कारण ती गोव्यातील विविध उद्योग क्षेत्रांनी व्यक्त केलेल्या चिंतेचे प्रतिनिधित्व करते.

हे निवेदन जीसीसीआय चे अध्यक्ष श्रीनिवास धेंपे यांनी मुख्यमंत्री सावंत यांना औपचारिकरित्या सादर केले. यावेळी जीसीसीआय चे महासंचालक संजय आमोणकर आणि करविषयक व वित्तीय सेवा समितीचे अध्यक्ष सीए रोहन भंडारे उपस्थित होते.

धेंपे यांनी निवेदनात कर प्रणाली अधिक सुलभ आणि व्यवहार्य करण्यासाठी विशेष सूचना मांडल्या. यामध्ये अनुपालन प्रक्रिया सोपी करणे, उद्योगांना स्थिरता देणे, आणि विशेषतः पर्यटन, आयटी, निर्यात आणि रिअल इस्टेट क्षेत्रांतील अडचणी दूर करण्यावर भर देण्यात आला आहे.

विविध दरांच्या गुंतागुंतीमुळे उद्भवणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी, एक सुसंगत आणि टप्प्याटप्प्याने लागू होणारा रोडमॅप तयार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.उलट शुल्क रचनेमुळे उत्पादन खर्च वाढतो आणि कामकाजासाठी लागणाऱ्या भांडवलावर परिणाम होतो. यावर त्वरित तोडगा काढावा, अशी मागणी चेंबरने केली आहे.तसेच लहान चुका दुरुस्त करता याव्यात यासाठी जीएसटी रिटर्नमध्ये सुधारणा सुविधा उपलब्ध करून द्यावी,जेणेकरून अनावश्यक खटले टाळता येतील.निर्यातदारांच्या आर्थिक ओझ्यावर दिलासा देण्यासाठी निर्यात क्षेत्रासाठी भांडवली वस्तूंवरील जीएसटी परतावा द्यावा ही मागणी करण्यात आली आहे.

सर्व हॉटेल्ससाठी एकसमान १२% जीएसटी दर लागू करावा. स्वतंत्र रेस्टॉरंट्सना इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी)चा लाभ अधिक प्रमाणात मिळावा.होम-स्टे, वेअरहाऊसिंग आणि हॉटेल बांधकामावरील खर्चासाठी आयटीसी उपलब्ध करून द्यावा अशा मागण्या देखील करण्यात आल्या आहेत. संयुक्त विकास करारांमध्ये कर आकारणीबाबत स्पष्टता नसल्याने गुंतवणूकदारांमध्ये संभ्रम निर्माण होतो. तसेच, दीर्घकालीन भाडेपट्ट्यांवरील कर आकारणीच्या संदर्भातही सुधारणा अपेक्षित आहेत.

पान २ ▶

# कुळे येथे भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**फोंडा, दि. १ :** कुळे -शिगाव मार्गावर आज सकाळी घडलेल्या भीषण अपघातात एका दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला असून, दुसऱ्या स्कूटरस्वाराने प्रसंगावधान राखून धावत्या वाहनावरून उडी मारून आपला जीव वाचवला. ही घटना कुळे वाकीकुयान परिसरात घडली.

अपघातात मृत्यू झालेल्या दुचाकीस्वाराची ओळख मंशु गावडा (वय ३५, रा. शिगाव) अशी पटली आहे. तर अपघातास कारणीभूत ठरलेला कारचालक अजवल पाटील (रा. कुळे ) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अजवल पाटील आपल्या ताब्यातील कारने मोलेहून कुडचडेकडे जात असताना त्याने भरधाव वेगात ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्न केला . याच वेळी समोरून येणाऱ्या मंशु गावडा यांच्या दुचाकीला कारची जोरदार धडक बसली. धडकेनंतर दुचाकी काही अंतरावर फरफटत गेली आणि गावडा याचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताच्या वेळी जवळच स्कूटरस्वार देखील समोरून येत होता. कारने त्याच्या स्कूटरकडे झेप घेत असल्याचे लक्षात येताच संबंधित स्कूटरस्वाराने प्रसंगावधान राखत धावत्या स्कूटरवरून उडी मारली. त्यामुळे तो गंभीर जखमी होण्यापासून थोडक्यात बचावला. मात्र स्कूटर आणि दुचाकी दोन्हींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

धडक दिल्यानंतर कार रस्त्याच्या बाजूला असलेल्या मातीच्या ढिगाऱ्यावर आदळली. या अपघातामुळे काही काळ वाहतुकीचा विस्कळीत झाला. घटनास्थळी कुळे पोलिसांनी तत्काळ धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांनी अपघातस्थळाचा पंचनामा केला असून, अधिक तपास सुरू आहे. मंशु गावडा यांच्या मृत्यूमुळे शिगाव परिसरात शोककळा पसरली आहे. स्थानिक नागरिकांनी अपघातग्रस्त रस्त्यावर वाहतूक नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजनांची मागणी केली आहे.

# कोविड-१९ रुग्णांची संख्या पोहोचली ३,३९५ वर

## दिल्लीतील महिलेसह २४ तासांत ४ मृत्यू, महाराष्ट्रात ६८ नवीन बाधित


**नवी दिल्ली, दि. १ :**

भारतात कोविड-१९ संसर्गाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत असून, देशात एकूण ३,३९५ सक्रिय रुग्णांची नोंद झाली आहे. गेल्या २४ तासांत दिल्लीसह देशभरातून ४ रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. महाराष्ट्रात देखील ६८ नवीन कोविड-१९ बाधित रुग्ण आढळले आहेत, ज्यामुळे राज्यातील रुग्णांची संख्या वाढली आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अहवालानुसार, केरळमध्ये सर्वाधिक १,३३६ सक्रिय रुग्ण आहेत, त्यानंतर महाराष्ट्र आणि दिल्ली यांचा क्रम आहे. देशभरात कोविड-१९ ची परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी आरोग्य विभागाकडून सतत उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

गेल्या ४८ तासांत भारतात कोविड-१९ मुळे चार रुग्णांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये दिल्लीतील ६० वर्षीय महिला, केरळ, कर्नाटक आणि उत्तर प्रदेशातील रुग्णांचा समावेश आहे. त्याचवेळी, १,४३५ रुग्णांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे, ज्यामुळे आरोग्य सुधारण्याचे संकेत दिसून येत आहेत.

महाराष्ट्रात शनिवार पर्यंत ४६७ सक्रिय रुग्ण असून, नव्या ६८ बाधितांपैकी ३० मुंबईत, १५ पुणे महानगरपालिकेत, तर कल्याण-डोंबिवली आणि रायगड जिल्ह्यातही नवे रुग्ण आढळले आहेत. कर्नाटक आरोग्य विभागाने नागरिकांना शांती राखण्याचे आवाहन केले आहे. विभागाने कोविड-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर जून महिन्यात शाळांना खबरदारी घेण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, सार्वजनिक ठिकाणी मास्क वापरणे, शारीरिक अंतर राखणे आणि स्वच्छता पाळण्याचा आग्रह करण्यात आला आहे.



दिल्लीमध्ये शनिवारी कोविड-१९ मुळे ६० वर्षीय महिलाचा मृत्यू झाला आहे. या महिलेला आधीपासून आतड्यांचे गंभीर आजार होते, ज्यामुळे कोविड-१९ चा परिणाम अधिक गंभीर झाला.

बेंगळुरूमध्ये देखील एका ६३ वर्षीय वृद्धाचा कोविड-१९ मुळे मृत्यू झाला असून, या मरणामुळे कर्नाटकमध्ये कोविड-१९ संबंधित मृत्यूंची संख्या चार झाली आहे. कर्नाटक आरोग्य विभागाने सांगितले की, राज्यात कोरोनाच्या चाचण्या आणि उपचार सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून, नागरिकांनी घाबरण्याची गरज नाही. ओडिशामध्ये आणखी दोन नवीन रुग्णांची नोंद झाली असून, राज्यातील एकूण बाधित रुग्णांची संख्या सात झाली आहे. राज्य आरोग्य सचिव अश्वथी एस यांनी सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगत, नागरिकांना संयम आणि जागरूकतेचा आग्रह केला आहे.

## निवडक

### भारताची लढाऊ विमाने पाडली ?

**नवी दिल्ली, दि. १ :** : 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान भारताची सहा लढाऊ विमाने पाडल्याचा दावा करत पाकिस्तानने खळबळ उडवून दिली होती. खुद्द पाक पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनीच हा दावा केला होता. पण आता भारताचे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (उञ्छ) जनरल अनिल चौहान यांनी पाकिस्तानचा हा खोटारडा दावा फेटाळून लावला आहे. सीडीएस अनिल चौहान सध्या सिंगापूरमध्ये शांग्री-ला संवाद परिषदेसाठी उपस्थित आहेत. तेथे ब्लूमबर्ग या अमेरिकन वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, पाकिस्तानचा दावा बिनबुडाचा आणि फसवा आहे. भारतीय वायूदलावर हल्ला झाला, काही नुकसानही झाले; पण सहा विमाने पाडली गेली, हा दावा पूर्णपणे चुकीचा आहे. 'विमानांचे किती नुकसान झाले हे महत्वाचे नाही पण विमानांते नुकसान का झाले हे शोधणे अधिक महत्वाचे आहे. यामधून आपण शिकतो, चुका सुधारतो आणि पुढे रणनीती अधिक सक्षम करतो,' असे मत त्यांनी मांडले. पुढे ते म्हणाले की, चुका समजल्या, सुधारल्या आणि अवघ्या दोन दिवसांत त्यावर कृती करून भारताने दूरवरच्या दहशतवादी तळांवर यशस्वी कारवाई केली.

---

### उत्तर भारतात उष्णतेची लाट

**लखनऊ, दि. १ :** केरळमध्ये ८ दिवस आधी आणि महाराष्ट्रात तब्बल १२ दिवस आधी मान्सून बरसलाय. मात्र उत्तर भारतातील यूपी, बिहार, झारखंड आणि मध्य प्रदेशातील लोकांना जोरदार पावसाची प्रतीक्षा आहे. उष्णतेच्या लाटेने हैराण झालेले उत्तर भारतीय चातकाप्रमाणे पावसाची वाट पाहताहेत. मग मान्सून उत्तर भारतात कधी धडकणार? उत्तर भारतीय कधी सुखावणार? चला तर जाणून घेऊयात हवामान विभागाचा ताजा अंदाज. यंदा मान्सूनने सर्वांनाच चकित केले. २४ मे रोजी केरळमध्ये दाखल झालेला पाऊस अवघ्या सहा दिवसांत अन्य १७ राज्यांमध्ये पोहोचला. केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, गोवा, आंध्र प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, ओडिशा, छत्तीसगड आणि ईशान्य भारतातील त्रिपुरा, मणिपूर, मिझोरम, मेघालय, आसाम, सिक्कीम या राज्यांमध्ये मान्सून सक्रिय झालाय. यंदा आतापर्यंत ३३ टक्के जास्त पाऊस झालाय, मात्र आता बंगालच्या उपसागरातील झालेल्या बदलामुळे मान्सूनचा वेग मंदावल्याचा अंदाज वर्तवण्यात येतोय.दुसरीकडे उत्तर भारतात अद्याप उष्णतेची लाट आहे. त्यामुळे उत्तर भारतीय उकाड्याने हैराण झाले आहेत. आहे. यूपी, बिहार, झारखंड आणि मध्य प्रदेशात नागरिक पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहात आहेत. आकाशाकडे डोळे लावून बसले आहेत. कधी एकदा पाऊस बरसतोय याची आतुरता वाढलीय.

---

### एनआयएकडून ८ राज्यांमध्ये १५ ठिकाणी छापे

**नवी दिल्ली, दि. १ :** पाकिस्तानशी संबंधित हेरगिरी प्रकरणाचा तपास अधिक तीव्र होत असून नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी (एनआय) ने आज सकाळपासूनच दिल्ली, महाराष्ट्र (मुंबई), हरियाणा, उत्तर प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, आसाम आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये एकाचवेळी पंधरा ठिकाणी मोठ्या प्रमाणात छापेमारी केली आहे.
या छाप्यांचे लक्ष्य पीआयओ शी संबंधित संशयित लोक आणि त्यांच्या मालमत्ता होत्या. एनआयएच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या छाप्यांमध्ये मोबाईल, लॅपटॉप, हार्ड ड्राइव्ह, संवेदनशील आर्थिक व्यवहारांची कागदपत्रं आणि आक्षेपार्ह डिजिटल साहित्य जप्त करण्यात आले आहे.
एनआयएच्या मते, हे संशयित पाकिस्तानस्थित व्यक्तींशी संपर्कात होते आणि भारतात हेरगिरी कारवायांसाठी आर्थिक मदतीचे माध्यम म्हणून काम करत होते. या संशयितांनी २०२३ पासून राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित गोपनीय माहिती पाकिस्तानला पुरवली असल्याचा संशय आहे. या प्रकरणात आधीच एक आरोपी अटकेत आहे, आणि त्याच्यापासून मिळालेल्या माहितीनंतर २० मे रोजी अधिकृत गुन्हा दाखल करण्यात आला होता.